Sanjeevani Multipurpose Foundation's
Dr. Deepak Patil Ayurvedic Medical College & Research Center
Borpadale Phata (Nebapur), Kolhapur-Ratnagiri Road, Tal- Panhala, Dist. Kolhapur, Pin – 416213, Maharashtra State, India.
Ph. No. 9132039595 Website: www.dpayurvediccollege.com Email: dr.deepakpatilayu@gmail.com
•Recognized By Central Council of Indian Medicine, New Delhi & Govt. of India, Ministry of Health & Family Welfare, Department of AYUSH, New Delhi & Govt. of Maharashtra, Medical Education & Medicine Dept.•
• Affiliated to Maharashtra University Of Health Sciences, Nashik •

# "स्पंदन 2023" सांस्कृतिक कार्यक्रमाचा अहवाल

डॉ. दीपक पाटील मेडिकल कॉलेज येथे या वर्षीच्या सांस्कृतिक कार्यक्रमाची अतिशय उत्साहात सुरुवात झाली. यावर्षीच्या कार्यक्रमाला "स्पंदन 2023" असे नाव दिले होते. सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत आपल्या कलागुणांचे प्रदर्शन या कार्यक्रमादरम्यान केले संस्थेचे अध्यक्ष डॉ. दीपक पाटील सर, सचिवा डॉ. स्वाती पाटील मॅडम सर्व संचालक वर्ग व प्राचार्य डाॅ. नितीन ताटपुजे सर या सर्वांचे नेहमीच विद्यार्थ्यांना प्रोत्साहन राहिले आहे. यासारख्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना प्रोत्साहन मिळते व हेच विद्यार्थी पुढे जाऊन युनिव्हर्सिटीच्या स्पंदन, इंद्रधनुष्य यासारख्या कार्यक्रमातून कॉलेजचे व विद्यापीठाचे नाव मोठे करतात. या सर्व विद्यार्थ्यांना कॉलेजतर्फे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा हा एक मार्ग आहे.

दिनांक 17 फेब्रुवारी रोजी या सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात झाली या दिवशी बॉलीवूड डे व फनी गेम्स ठेवण्यात आले होते, यामध्ये सर्व बॅचच्या विद्यार्थ्यांनी अतिशय उत्स्फूर्तपणे सहभाग घेत विविध अभिनेता, अभिनेत्रींचे हावभाव पोशाख करत मनोरंजन केले. त्याचबरोबर दुपारच्या सत्रात फनी गेम्स ठेवण्यात आल्या होत्या यामध्ये flip the bottle, ball throw, cup arrangement यासारखे विविध गेम्स ठेवण्यात आले होते व विजेत्याला कॅडबरी चॉकलेट भेट देण्यात आले.

दिनांक 20 फेब्रुवारी दिवशी साडी व कुर्ता डे व दुपारच्या सत्रात fishpond चा कार्यक्रम आयोजित केला होता याला देखील सर्वच विद्यार्थ्यांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला.

दिनांक 21 फेब्रुवारी रोजी fireless cooking हा इव्हेंट आयोजित केला होता यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध स्टॉल्स लावले होते त्यामध्ये सँडविच, पाणीपुरी, भेळ, लस्सी, दाबेली, कचोरी यासारखे विविध स्टाॅल्स लावले होते, याचे उद्घाटन संस्थेच्या सचिवा डॉ स्वाती पाटील मॅडम व संचालिका डॉ स्मिता पाटील मॅडम तसेच कॉलेजचे प्राचार्य नितीन ताटपुजे सर यांनी केले, विद्यार्थ्यांनी अतिशय चविष्ट रेसिपी बनवल्या होत्या, इतर विद्यार्थ्यांनी याचा आस्वाद घेतला.

Scanned by CamScanner

दिनांक 23 फेब्रुवारी रोजी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते, सायंकाळी पाच वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात झाली या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष डॉ. दीपक पाटील सर, उपाध्यक्ष श्री सचिन पाटील सर, सचिवा डॉ स्वाती पाटील मॅडम , संचालिका डॉ स्मिता पाटील मॅडम, कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन ताटपुजे सर उपस्थित होते साधारण सायंकाळी पाच वाजता चालू झालेला हा सांस्कृतिक कार्यक्रम सायंकाळी साडेआठ वाजेपर्यंत चालू होता यामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत गणेश वंदना, कथ्थक, भरत नाट्य , एकांकिका, फ्युजन बॉलीवूड डान्स, सोलो डान्स,एकपात्री प्रयोग यासारखे विविध कलागुणांचे सादरीकरण केले व सर्वांचे मनोरंजन केले यामधून जे विशेष परफॉर्मन्स होते त्यांना संस्थेतर्फे तसेच अध्यापकांतर्फे बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

या स्नेहसंमेलनाचा पारितोषिक वितरण समारंभ शनिवार दि. 25 फेब्रुवारी 2023 रोजी गोकुळ दूध संघ कोल्हापूरच्या संचालिका आणि माजी अध्यक्षा- जिल्हा परिषद कोल्हापूर, सौ शौमिका अमल महाडिक यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते आयुर्वेदिक कॉलेजच्या युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमामध्ये प्रथम वर्षात व तृतीय वर्षात नंबर आलेल्या विद्यार्थ्यांना तसेच क्रीडा प्रकारांमध्ये वैयक्तिक व सांघिक विजेत्या विद्यार्थ्यांना यांच्यातर्फे मेडल व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी सौ. महाडिक यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. वैद्यकीय शिक्षणाचा अभ्यास, वैद्यकीय व्यवसाय आणि समाजसेवा याविषयी चतु:सूत्रीचा अत्यंत बहुमोल कानमंत्र विद्यार्थ्यांना दिला. संस्थेच्या सचिव डॉ. सौ. स्वाती दीपक पाटील यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. यावेळी त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आपल्या ध्येयप्राप्तीसाठी कशाप्रकारे झटून संघर्ष करावा याविषयी मार्गदर्शन केले व स्वानुभव कथन केले.

संजीवनी मल्टीपर्पज फाउंडेशनच्या दिनदर्शिकेचे अनावरण याप्रसंगी पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. दीपक पाटील, उपाध्यक्ष मा. श्री. सचिन पाटील, व्यवस्थापकीय संचालिका डॉ. सौ.स्मिता पाटील, कार्यकारी संचालक डॉ. बाबासो पाटील, डॉ. श्रीनिवास पाटील, संचालक मा. श्री. आनंदराव पाटील, आयुर्वेद कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन ताटपुजे, नर्सिंग इन्स्टिट्यूटचे प्राचार्य श्री. महेश बामणी, मार्गदर्शक श्री. उत्तम नांगरे, श्री. मोहन पाटील, सर्व अध्यापक, अध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री महेंद्र कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. केदार तोडकर यांनी आभार व्यक्त केले.

अशा पद्धतीने "स्पंदन 2023" या कार्यक्रमाची सांगता झाली.

Principal
Dr Deepak Patil Ayurvedic Medical College
& Research Center, Borpadale Phata, Tal. Panhala
Dist. Kolhapur-416 213.

Scanned by CamScanner